# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.04.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात सात मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रचाराचं वातावरण तापलं
2. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आज आणि उद्या राज्यात सहा सभा
3. केंद्रातलं मोदी सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नसल्याची शरद पवार यांची शेवगाव इथल्या सभेत टीका
4. राज्यात उन्हाच्या वाढत्या प्रकोपामुळे दोन महिन्यात 184 जणांना उष्माघाताचा त्रास, सोलापूर आणि नाशिकमध्ये यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद आणि
5. कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<u>निवडणूक प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात सात मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रचार शिगेला पोहोचला आहे. विविध राजकीय पक्षांचे राष्ट्रीय तसंच राज्यस्तरावरील नेते संबंधित मतदारसंघांचे दौरे करून प्रचार फेऱ्या, प्रचारसभा घेत आहेत. तिसऱ्या टप्प्यातील महायुतीच्या उमेदवारांसाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या येत्या दोन दिवसांत म्हणजे आज आणि उद्या राज्यात 6 सभा होणार आहेत, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल दिली. पंतप्रधान मोदी यांच्या आज आणि उद्या प्रत्येकी तीन सभा होणार आहेत. आज ते सोलापूर, कराड आणि पुण्यामध्ये तर उद्या माळशिरस, धाराशिव आणि लातूर इथं प्रचारसभा घेणार आहेत.

**<u>शरद पवार आरोप-अहमदनगर</u>**

केंद्रातलं नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नाही असा आरोप शरद पवार यांनी केला आहे. पवार यांनी काल अहमदनगरमधल्या शेवगाव इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांच्यासाठी प्रचारसभा घेतली.

**<u>गीते सभा</u>**

रायगड जिल्ह्यात निजामपूर इथं काल इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांची प्रचार सभा झाली. नरेंद्र मोदी यांच्यामुळे देश हुकूमशाहीकडे वळत असल्याचा आरोप गीते यांनी यावेळी केला.

**<u>गोयल</u>**

महायुतीचे उमेदवार पीयूष गोयल यांनी काल बोरिवलीत स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून 'जन आशीर्वाद प्रचार रथा'सह शक्ती प्रदर्शन करत पथफेरी काढली.

## दुसरा टप्पा टक्केवारी

भारतीय निवडणूक आयोगाच्या अँपवर प्रकाशित करण्यात आलेल्या ताज्या आकडेवारीनुसार राज्यात दुसऱ्या टप्प्यात 8 लोकसभा मतदार संघात मिळून सरासरी मतदान 62 पूर्णांक 71 शतांश टक्के झालं आहे. यामध्ये सर्वाधिक 64 पूर्णांक 85 शतांश टक्के मतदान वर्धा मतदार संघात झालं आहे. तर नांदेड मतदारसंघात सर्वांत कमी म्हणजे 60 पूर्णांक 49 शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे. अनेक मतदार संघांत महिलांचं मतदान करण्याचं प्रमाण पुरुषांपेक्षा कमी असल्याचं आढळून आलं आहे. पहिल्या टप्प्यात राज्यात सरासरी 63 पूर्णांक 71 शतांश टक्के मतदान झालं होतं.

## मतदान जागृती

दरम्यान, राज्यात उर्वरित टप्प्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या चार मतदारसंघांसह मुंबई शहरातील सहाही मतदारसंघात 20 मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या दिवशी मुंबईकरांनी मुंबईतच थांबून मनापासून मतदान करावं, असं आवाहन प्रसिद्ध गायक शान ऊर्फ शंतनु मुखर्जी यांनी काल केलं. मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या विधानसभेच्या वांद्रे पश्चिम मतदारसंघात स्वीप कार्यक्रमांतर्गत काल सकाळी खार जिमखाना इथून 'व्होट टू व्होट रॅली'चं आयोजन करण्यात आलं. या फेरीत नॅशनल कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. मुंबईतील प्रत्येक मतदारानं मतदान करावं, अशा आशयाच्या उदघोषणा मुंबईतील रेल्वे स्थानकांवरील ध्वनिक्षेपण यंत्रणांच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. बीड लोकसभा मतदार संघात येणाऱ्या बीड, केज, माजलगाव, आष्टी, परळी, गेवराई या सहा विधानसभा मतदारसंघातही मतदान जागृतीसाठी काल सकाळी सायक्लोथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यासह बीड शहरातील नागरिक यामध्ये मोठ्या संख्येनं सहभागी झाले.

## राज्यपाल

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे रोगनिदान आणि उपचार यामध्ये क्रांतिकारी बदल होत आहेत. विशेषतः विविध प्रकारचे कर्करोग, हृदयविकार, त्वचा रोग, दंत चिकित्सा या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता परिवर्तनकारी बदल होत आहेत. मात्र या तंत्रज्ञानामुळे जनसामान्यांचा रोगनिदानाचा आणि उपचाराचा खर्च कमी झाला पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी काल मुंबईत केलं. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि बॉम्बे हॉस्पिटल यांनी आयोजित केलेल्या 'आरोग्यसेवा आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावरील एक दिवसाच्या चर्चासत्राचं उद्घाटन राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत काल बॉम्बे हॉस्पिटलमध्ये झालं, त्यावेळी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्रांतिकारी तंत्रज्ञान वैद्यकीय क्षेत्रातील एकूणच परिदृश्य बदलवणारं असेल असं सांगून कृत्रिम प्रज्ञेच्या मदतीने मधुमेह आणि इतर जीवनशैली संबंधी समस्यांचे ओझं कसं कमी करता येईल या संबंधी संशोधन झालं पाहिजे, असंही राज्यपाल म्हणाले.

## एस. चोक्कलिंगम दौरा- रत्नागिरी, सिंधुदुर्ग

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी काल रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातल्या निवडणूक तयारीचा आढावा घेतला. चोक्कलिंगम यांनी मिरजोळे औद्योगिक वसाहतीतील शासकीय गोदामातल्या मतमोजणी केंद्राला भेट देऊन पाहणी केली. तसंच कुवारबावमधल्या सामाजिक न्याय भवनमधल्या ईव्हीएम केंद्रालाही त्यांनी भेट दिली. चोक्कलिंगम यांनी काल सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयातही संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. जिल्ह्याच्या लगत असणाऱ्या चेक पोस्टवर विशेषत: बॉर्डर चेकपोस्टवर बारकाईनं नजर ठेवावी, वाहनांची काटेकोर तपासणी करावी, चेक पोस्टवरच्या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय ठेवावा अशा सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या.

**<u>शिवसंग्राम</u>**

शिवसंग्राम संघटनेनं लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आहे अशी माहिती राष्ट्रीय अध्यक्षा डॉक्टर ज्योती मेटे यांनी काल संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची बैठकीनंतर पुण्यात सांगितलं. विधानसभेला मात्र संघटनेच्या वतीनं 12 जागांवर निवडणूक लढविली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>वर्धापन-सांगली</u>**

सांगलीतील अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचा 82 वा वर्धापन उत्साहात साजरा करण्यात आला. 'जयतु नटेश्वर' हा नाट्य संगीताचा कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर शरद कारळे तसच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>उष्माघात रुग्ण</u>**

राज्यात उन्हाचा प्रकोप दिवसेंदिवस  वाढत आहे. गेल्या दोन महिन्यात उष्माघाताच्या 184 रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात सर्वाधिक 20 रुग्ण धुळे जिल्ह्यातील आहेत. त्या खालोखाल ठाणे 19, नाशिक 17, वर्धा 16, बुलडाणा 115, सातारा 14, सोलापूर 13 आणि सिंधुदुर्ग 10 अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात यंदा उष्माघाताने मृत्यू झाल्याची नोंद नाही. पुण्यातही सहा रुग्ण आढळून आले. राज्यात गेल्या वर्षी 1 मार्च ते 31 जुलै या कालावधीत उष्माघाताने 22 जणांचा मृत्यू झाला होता. त्यातील सर्वाधिक 13 मृत्यू औरंगाबाद जिल्ह्यातील होते, अशी माहिती राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

**<u>सर्वाधिक तापमान-सोलापूर, नाशिक</u>**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून तापमानात सातत्यानं वाढ होत आहे. रविवारी काल जिल्ह्यात या वर्षातील सर्वाधिक म्हणजे 43 पूर्णांक 7 अंश सेल्सियस कमाल तापमान  नोंदवलं गेलं. नाशिकमध्येही काल यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक 41 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतक्या कमाल  तापमानाची नोंद झाल्याचं वेधशाळेनं सांगितलं.

**<u>हवामान</u>**

परभणी जिल्ह्यात काल रात्री विजा, वादळी वाऱ्यांसह पाऊस पडला. यामुळे  काढणी झालेली हळद, ज्वारी पिकांसह आंबा आणि टरबूज पिकांचे नुकसान होत आहे. कोकणात आज आणि उद्या उष्णतेची लाट राहण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र हवामान कोरडं राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.